# आधुनिक शेळीपालन

शेळीचे महत्त्व महात्मा गांधीजींनी ओळखले होते. कुटुंबाची दुधाची गरज आणि गरजेला करडू विकून केव्हाही मिळणारा पैसा, उत्कृष्ट रोग प्रतिकारक शक्ती, प्रतिकुल परिस्थितीत तग धरून राहण्याची क्षमता यामुळे शेतकरी, शेतमजूर व भूमिहीन यांचेकडे शेळीपालन हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात आढळून येतो.

**जगाच्या २०% शेळ्या (१४० मिलियन शेळ्या) भारतात असून जगात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात १०.७ दशलक्ष तर सोलापूर जिल्ह्यात ८.३४ लक्ष शेळ्या आहेत.**

सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात मांसासाठीच शेळीपालन केले जाते. परंतू अजूनही याकडे कोणीही व्यवसायिक दृष्टीकोनातून पाहात नाही. शेळीपालन व्यवसायिक पद्धतीने केल्यास, ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक स्थिती बदलण्याची क्षमता शेळीपालन व्यवसायात आहे. त्यासाठी आपल्याकडे असणाऱ्या उस्मानाबादी शेळी संगोपनाची संपूर्ण शास्त्रीय माहिती असणे गरजेचे आहे.


## उस्मानाबादी शेळीची वैशिष्ट्ये

उस्मानाबादी जातीच्या शेळ्या सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, बीड, परभणी, अहमदनगर, औरंगाबाद व सातारा या जिल्ह्यात आढळतात.

| | | | |
|---|---|---|---|
| **रंग** | : काळा | **त्वचा** | : कोरडी |
| **कान** | : लोंबते | **शिंगे** | : मागे वळलेली |
| **कपाळ** | : बहिर्वक्र | **शरीर वाढ क्षमता** | : चांगली |

### प्रजनन क्षमता -

| | |
|---|---|
| प्रथम माजावर येण्याचे वय | : ७ ते ८ महिने |
| प्रथम गर्भधारणेच्या वेळेचे वय | : ८ ते ९ महिने |
| प्रथम विताचे वय | : १३ ते १४ महिने |
| दोन वितातील अंतर | : ७ ते ७.५ महिने |
| गाभण काळ | : ५ महिने |
| प्रथम वेताच्या वेळी वजन | : २४ किलो |
| माजाचा कालावधी | : ३३ ते ३४ तास |



## मांसोत्पादन क्षमता

**नर : ०६ महिने**
**मादी : १२ महिने**

कत्तल करतेवेळी वजन : १४.२० कि. ते २३.३० कि.
खाण्यायोग्य मांस : ४९.३% ते ५०%

**शेळ्यांचे मटनातील घटक** : अर्द्रता-७४.०%, प्रथिने २१%, स्निग्ध पदार्थ-३.६%, खनिजे-१.१%, कॅल्शिअम-१२ मि.ग्रॅ./१०० ग्रॅ, फॉस्फरस-१९३.० मि.ग्रॅ./१०० ग्रॅम, ऊर्जा-११८ कि.कॅलरी/१९९ ग्रॅम

**शेळ्यासाठींचे गोठे** : पाचट किंवा गवताचे छप्पर, ऊन व वाऱ्यापासून आडोसा होण्याइतपत ४ फुटाची भिंत व त्या ठिकाणी चाऱ्यासाठी गव्हाणी व पाण्याचा हौद इत्यादी सोयी असलेला गोठा शेळ्यांकरिता उत्तम होय.

**गोठ्यांची दिशा** : दक्षिणोत्तर दिशेस समांतर असावी.

**जमीन** : मुरमाड व उंचवट्याची असावी. गोठ्यातील मुरमाचा थर वर्षातून एकदा बदलावा.

**छप्पर** : उपलब्ध लाकडी बल्ल्या, बांबु पाचट, भाताचा पेंढा इ. साधनांचा वापर करावा.

**प्रतिशेळी गोठ्यातील जागा** :

१२ चौ.फुट असावी, शक्य झाल्यास गोठ्याभोवती तारेचे

**शेळ्यांचे खाद्य व्यवस्थापन** : शेळ्यांचे खाद्य ही सर्वात खर्चिक बाब आहे. शेळींचे स्वास्थ व तिच्यापासून होणारी पैदास ह्या बाबीसुद्धा बऱ्याच अंशी शेळीच्या खाद्यावर अवलंबून असतात. त्यामुळे शेळीस योग्य तो पोषक आहार देणे अत्यंत गरजेचे असते.

१) शेळ्यांचे खाद्य व त्यांचे प्रमाण हे शेळ्यांचे वय व अवस्थेप्रमाणे ठरवावे. लहान करडांना पहिले सहा महिने दुधाबरोबरच फक्त द्विदल चारा द्यावा. २) गाभण अवस्थेत शेवटचे ६ आठवडे व विल्यानंतर ८ आठवडे शेळींना नेहमीपेक्षा दुप्पट आहार द्यावा. ३) पूर्ण वाढ झालेल्या शेळीला संपूर्ण आहाराच्या शुष्क भागाच्या १०% तर करडांना संपूर्ण आहाराच्या शुष्क भागाच्या १८% प्रथिनांची गरज असते. चारा दिवसातून वेगवेगळ्या वेळी थोडा थोडा द्यावा. ४) १ लिटरपेक्षा जादा दूध देणाऱ्या शेळ्यांना प्रतिदिनी हिरवा चारा ३ ते ४ किलो, वाळलेला चारा १ किलो व १०० ते २०० ग्रॅम खुराक देणे आवश्यक आहे. ५) शेळ्यांना दर दिवशी ३ ते ४ लिटर स्वच्छ पाणी पाजावे.

**शेळ्यांचे प्रजनन** : शेळी ७ ते ८ महिने वयामध्ये प्रथम माजावर येते व त्यानंतर प्रत्येक २१ दिवसांनी परत माजावर येते. माज आल्यानंतर २० ते २४ तासाच्या आत शेळी नैसर्गिक किंवा कृत्रिम पद्धतीने भरवून घ्यावी. शेळीचा गाभण काळ १५० दिवसांचा असतो. शेळी व्यायल्यानंतर

**पैदाशीसाठी शेळीची निवड :** शेळ्या खरेदी करताना शक्यतो दोन दाती व गाभण असलेल्या निवडाव्यात. पैदाशीसाठी निवड केलेल्या शेळीच्या नाकपुड्या मोठ्या डोळे पाणीदार, शरीर लांबट व मजबुत असावे. शेळीच्या पायाची ठेवण ही सरळ व शरीराचा आकार त्रिकोणी (पुढील भाग निमुळता व मागील भाग पसरट) असावा. शरीरावरील केस, त्वचा तुकतुकीत, कास मोठी व दूध काढल्यानंतर एकदम लहानहोणारी असावी, तिच्यावरील शिरा सुस्पष्ट दिसाव्यात. सडांचा आकार व लांबी सारखी तसेच ते मुके नसावेत.

**शेळीच्या माजाची लक्षणे**

१) शेळी खाणे-पिणे टाळते.

२) विशिष्ट आवाज काढते व वारंवार लघवी करते.

३) इतर शेळ्यांवर उडते किंवा शेळ्यांना उडू देते.

४) योनी औष्ठ थोडेसे सुजतात व योनीतून पारदर्शक सोट बाहेर येतो.

५) कळप्यात बोकड असेल तर त्याच्या जवळ जाऊन ती उभी राहतो.

**पैदाशीसाठी नराची निवड व काळजी :** पैदाशीचा नर निवडताना तो जुळा किंवा तिळा जन्मलेला तसेच तो वजनदार असावा. पैदाशीसाठी नराची निवड करताना तो दुसऱ्या कळपातील असावा. नर चपळ, बांधेसूद व शुद्ध पैदाशीचा व अंडकोषात दोन्हीही अंडग्रंथी असाव्यात. १ते२ वर्षाच्या अंतराने पैदाशीचा नर बदलावा. पैदाशीच्या काळात नरांना जादा खुराक द्यावा. नरांना सतत शेळ्यांमध्ये ठेवू नये. एक बोकड साधारणपणे २५ ते ३० शेळ्यामध्ये ठेवावा.

**करडांचे संगोपन :** नविन जन्मलेल्या करडाला १ तासाच्या आत चिक पाजावा. करडांना दिवसातून दोनदा त्याच्या वजनाच्या १०% दूध पाजावे. करडे १० ते १२ दिवसांची असतानाच त्यांना हिरवा व कोरडा चारा देण्यास सुरुवात करावी. करडे आईपासून २ ते ३ महिन्यानंतर वेगळी करावीत. मांसासाठीच्या बोकडाचे खच्चीकरण करावे, त्यामुळे त्याची वाढ चांगली होते. मांस लवकर तयार होते व कातडी मऊ होऊन कातडीचा दर्जा सुधारतो.

**शेळ्यांचे आरोग्य :** शेळ्यांच्या आरोग्यबाबत खुप काळजी घेणे महत्वाचे असते. रोग झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा

## जंतनाशकाचा वार्षिक कार्यक्रम

| अ.नं. | जंताचे नाव | जंतनाशकाचे नाव | महिना |
|---|---|---|---|
| १. | टेपवर्म (फितीसारखे) | मोरचूदाचे द्रावण | जानेवरी व जून |
| २. | स्ट्रँगाईल (गोलकृमी) | फिनोव्हर बॅबनीन | मार्च व जुलै |
| ३. | लिव्हर फ्ल्युक (चपटे कृमी) | फेनबेन्डॉझोल | मे व ऑक्टोबर |

शेळ्यांच्या मोठ्या कळपासाठी दरवर्षी क्षय, जोन्स इ. रोगांचे व गर्भपाताचे परिक्षण करणे आवश्यक असते आणि ज्या शेळ्या संसर्गजन्य असतील त्यांना कळपातून काढून टाकावे.

## लसीकरणाचा वार्षिक कार्यक्रम

| अ.नं. | रोग | लस | लसीकरणाची वेळ | मात्रा |
|---|---|---|---|---|
| १. | घटसर्प | तुरटीयुक्त लस<br>तैलयुक्त लस | मे व डिसेंबर<br>दरवर्षी मे महिन्यात | २.५ मिली कातडीखाली<br>१ मिली स्नायुत |
| २. | लाळ्या खुरकुत | रक्षा | ऑक्टोबर व एप्रिल | १ मिली कातडीखाली |
| ३. | आंत्रविषार | मल्टी कम्पोनंट | जानेवारी व ऑगस्ट बुस्टर डोस | १ मिली कातडीखाली |
| ४. | संसर्गजन्य फुफ्फुसाचा दाह | सी.सी.पी.पी. | दरवर्षी डिसेंबरमध्ये | ०.२ मिली कानाच्या टोकाच्या आतील जागेत |
| ५. | बुळकांडी | टी.सी.आर.पी | दर दोन वर्षांनी फेब्रुवारीत | १ मिली कातडीखाली |
| ६. | फऱ्या | अॅलम प्रिसीपीटेड | जानेवारी व एप्रिल | २.५ मिली कातडीखाली |
| ७. | अँथ्रॅक्स | अँथ्रॅक्स | दरवर्षी एप्रिलमध्ये | ०.५ मिली कातडीखाली |

तसेच शेळीला कोणताही आजार झाल्यास त्वरित पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.

वरील प्रकारे सुधारित शेळी पालनाच्या तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन वाढवून आर्थिक उन्नती साधता येणे सहज शक्य आहे.


संपादक व प्रकाशक
**डॉ. लालासाहेब तांबडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

• लेखक •
डॉ. प्रकाश कदम
विषय विशेषज्ञ पशुवैद्यक शास्त्र


डॉ. लालासाहेब तांबडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख



• तांत्रिक माहिती स्रोत •
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर


# आधुनिक शेळी पालन

औद्योगिक रित्या उत्तम व्यवसाय!




प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ
शबरी कृषी प्रतिष्ठान संचलित,
**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**
गट नं. २२/१ ब, सोलापूर-बार्शी रोड, मु. खेड,
पोस्ट-केगांव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र)